# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O. Office, Palghar

**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**

**प्रेसनोट दि.०६/०५/२०१८**

## पालघर पोलीस ठाणे येथे महिलांचे सुरक्षीततेसाठी महिलांविषयीचे नवनवीन कायदयांची परिपुर्ण माहिती शिबीराचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ०५/०६/२०१८ रोजी पालघर पोलीस ठाणे येथे सख्य महिला मार्गदर्शन केंद्राचे वतीने महिला केंद्राचे डायरेक्टर रेजीना मिनेजीस व त्यांचे सहकारी यांनी मा.श्री.मंजुनाथ सिंगे, जिल्हा पोलीस अधीक्षक पालघर यांचे संकल्पनेतुन महिलांचे सुरक्षीततेच्या अनुषंगाने महिलांविषयीचे नवनवीन कायदयांची परिपुर्ण माहिती पोलीस अंमलदार यांना मिळावी या करीता शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरचे शिबीर पालघर पोलीस ठाण्यात दिनांक ०५/०६/२०१८ रोजी सकाळी १०.०० ते १२.३० वा.चेदरम्यान घेण्यात आले. शिबीरामध्ये सहाय्यक पोलीस अधिक्षक, तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,मा.निमीत गोयल, पालघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक,किरणकुमार कबाडी, तसेच पालघर उप विभागातील पुरुष व महिला पोलीस कर्मचारी हजर होते. शिबीरात ॲडव्होकेट श्रीमती आयरीन, हायकोर्ट मुंबई यांनी महिला व पुरुष लिंगभेद, समाजात महिलांना मिळणारी दुय्यम दर्जाची वागणुक, महिलांवर परंपरागत लादण्यात आलेली बंधने, हुंडाबळी, महिलांचे मनात समाजात जगतांना असुरक्षीततेची भावना, या व ईतर महिलांवरिल अत्याचाराने पिडीत महिलांना कोणत्या कायदयाने संरक्षण मिळुन त्यांचे सबलीकरण होवु शकते, व त्यामुळे महिला समाजात मानाने कशा जगु शकतात याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात आभार प्रदर्शनात पालघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, श्री.किरणकुमार कबाडी यांनी अशा प्रकारचे शिबीर दर तिन महिन्यांनी आयोजीत करण्यात यावे त्यात पालघर पोलीस ठाण्याकडुन पुर्णपणे सहकार्य करण्यात येईल जेणेकरुन महिलांविषयी नवनविन कायदयाचे ज्ञान सर्व पोलीस अंमलदार यांना अवगत करता येईल व महिलांना संरक्षण मिळुन त्या समाजात पुरुषांचे बरोबरीने मानाने जगु शकतील.